अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,
एस.आर.ए.बिल्डींग, ए-विंग, दुसरा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई-400 051.
फोन व फॅक्स-022 26591586, Email:-ccfmangrove@mahaforest.gov.in/ccfmmumbai@gmail.com

विषय :- कोकण विभागातील वेटलँड संदर्भात
पाणथळ तक्रार निवारण समितीची
बैठकीचे इतिवृत्त.

जा.क्र.उप.व/कांकमुं/सभा/ 16 /२०१७-१८
वांद्रे. दिनांक :- १९/०६/२०१७

प्रति,

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
   संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक पर्यावरण विभाग.
६. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
७. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची ६ वी बैठक दि. 03/05/2017 रोजी मा. विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली, मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे जुने सचिवालय, फोर्ट मुंबई येथील कार्यालय येथे घेण्यात आली. सदर बैठकीचे मंजुर इतिवृत्त माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा ही विनंती.

( जयरामेगौडा आर.)
सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई

**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची 6 वी मासिक बैठक.**

दिनांक 3.5.2017

**स्थळ :- विभागीय आयुक्त कोकण विभाग, जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई**

विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि 3.5.2017 रोजी कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची सभा आयोजित करण्यात आलेली होती. मा. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीस खालील अधिकारी व व्यक्ति उपस्थित होत्या.

| अ.क्र. | नाव | कार्यालय | पद |
|---|---|---|---|
| 1 | श्री. प्रभाकर देशमुख | विभागीय आयुक्त, कोकण भवन | विभागीय आयुक्त |
| 2 | श्री. जयरामेगौडा आर. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई | सदस्य सचिव, कोकण पाणथळ तक्रार निवारण समिति तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई. |
| 3 | श्री. बन्सी गवळी | जिल्हाधिकारी मुंबई शहर | अपर जिल्हाधिकारी मुंबई शहर |
| 4 | श्री. पी.डी.मलिकनेर | जिल्हाधिकारी रायगड | अपर जिल्हाधिकारी रायगड |
| 5 | श्री. ओमप्रकाश दिवटे | ठाणे महानगरपालिक | उप-आयुक्त |
| 6 | श्री. दिपक पुजारी | मिरा भाईंदर महानगरपालिका | उप-आयुक्त |
| 7 | श्री. अजीज | वसई विरार महानगरपालिका | उप-आयुक्त |
| 8 | श्री. हिरालाल सोनवणे | अपर आयुक्त, विभागीय आयुक्त, कोकण विभाग. | अपर आयुक्त |
| 9 | श्रीमती. वंदना सुर्यवंशी | जिल्हाधिकारी ठाणे | निवासी उपजिल्हाधिकारी ठाणे |
| 10 | श्री. टी. एन.पाटील | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष मुंबई | सहाय्यक वनसंरक्षक |
| 11 | श्री. डी.एस.चाबुकस्वार | नवी मुंबई महानगरपालिका | उप-आयुक्त |
| 12 | श्री. जयकुमार बाबुराव सुर्यवंशी | सिंधुदुर्ग | पोलिस निरीक्षक |
| 13 | श्री. एम.जी.इंगळे | महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई. | क्षेत्र अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ |
| 14 | श्रीमती. मनिषा प्रधान | ठाणे महानगरपालिका | ठाणे महानगरपालिका यांचे प्रतिनिधी |
| 15 | कु. निशा कांबळे | जिल्हाधिकारी रत्नागिरी | विशेष भुसंपादन अधिकारी |
| 16 | डॉ. नवनाथ जरे | जिल्हाधिकारी पालघर | निवारी उपजिल्हाधिकारी |
| 17 | श्री. विठ्ठल इनामदार | सिंधुदुर्ग | SDO, Sawantwadi |
| 18 | श्री. किशोर रामदास खैरनार | जिल्हा पोलिस अधिकक्षक, पालघर | पोलिस निरिक्षक |

बैठकीमध्ये सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले. :-

| अ.क्र. | मुद्दा | करावयाची कारवाई | अंमलबजावणी |
|---|---|---|---|
| 1 | समितीच्या पाचव्या बैठकीतील आढावा | विभागीय आयुक्त यांनी दिनांक 29.3.2017 रोजी झालेल्या पाचव्या बैठकीचे इतिवृत्त व त्यावर करावयाची कारवाई यांचा आढावा घेतला मागील बैठकीत चर्चा केलेल्या विषयांवर पुर्वीच चर्चा झाल्याचे सदस्य सचिव यांनी सांगितले. | |
| 2. | तक्रार अर्जाच्या चौकशीबाबत. | पाणथळ क्षेत्राच्या ऱ्हासाबाबत प्राप्त झालेल्या सर्व जुन्या तक्रारींचा अहवाल एका आठवड्यात सादर करुन त्यावर कारवाई करण्यात यावी व नवीन तक्रारींचा अहवाल एका महिन्याच्या आत सादर करुन त्यावर कारवाई करण्याच्या सुचना मा. आयुक्त यांनी दिल्या. संबंधितांनी सदर तक्रारीची सखोल चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सुचना मा. आयुक्तांनी दिल्या. | सर्व समिती सदस्य. |
| 3 | विविध ठिकाणी होणाऱ्या वेटलँडच्या ऱ्हासाबाबत आढावा घेणे | 1. श्री. अनिकेत सतिश वाडीवकर :-<br>श्री. अनिकेत सतिश वाडीवकर यांनी मौजे आगाशी, ता. वसई, जि. पालघर येथील सर्वे क्र. 233 हिस्सा नं.1अ, या जागेतील पाणथळ क्षेत्रावरील अतिक्रमणासंदर्भात तक्रार प्राप्त झालेली आहे. याबाबत उपस्थित निवासी उपजिल्हाधिकारी पालघर यांनी सदर तक्रारीबद्दलचा अहवाल 2 दिवसाच्या आत सदस्य सचिव यांना सादर करण्याचे आश्वासन दिले. | जिल्हाधिकारी पालघर. |
| | | 2) श्री. विवेकानंद गुप्ता.:-<br>श्री. विवेकानंद गुप्ता यांच्या 07/02/2017 च्या तक्रार अर्जानुसार अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर मधील मिठी नदी परिसरात कांदळवनापासुन 50 मीटरचे आत विकासकांनी घनकचरा टाकून बांधकाम केल्याबाबत व मिठी नदीचा नैसर्गिक प्रवाह अडविल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली आहे. याबाबत जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी माहिती दिली की, उपविभागीय अधिकारी (SDO) यांनी चौकशी केली असुन त्याचा अहवाल 8 दिवसाच्या आत सदस्य सचिव यांना सादर करण्याचे आश्वासन दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 3) श्री. धीरज परब :-<br>श्री. धीरज परब यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका, क्षेत्रातील पाणथळ क्षेत्रावर अतिक्रमण संदर्भात तक्रार केलेली आहे. याबाबत उपस्थित सदस्य प्रतिनिधी वसई विरार महानगरपालिका, मिरा भाईदर महानगरपालिका यांनी सदर तक्रारीबद्दलचा अहवाल 8 दिवसाच्या आत सदस्य सचिव यांना सादर करण्याचे आश्वासन दिले. | मिरा भाईंदर महानगरपालिका. |
| | | 4) कुलदीप चौधरी :-<br>श्री. कुलदीप चौधरी यांनी ईमेल द्वारे नायगाव (प) ता. वसई जि. पालघर येथील कांदळवनावर भरणी करुन सुमारे 1 एकर क्षेत्रावरील कांदळवने नष्ट केल्याची तक्रार प्राप्त झाली आहे. याबाबत उपस्थित निवासी उपजिल्हाधिकारी पालघर व उपआयुक्त वसई विरार महानगरपालिका यांनी सदर तक्रारीबद्दलचा अहवाल 8 दिवसाच्या आत सदस्य सचिव यांना सादर करण्याचे आश्वासन दिले. | जिल्हाधिकारी पालघर, आयुक्त वसई विरार महानगरपालिकापालिका. |
| | | 5) रोहीत जोशी :-<br>श्री. रोहीत जोशी ठाणे यांनी स्वामी समर्थ मठ कोपरी ठाणे (पु) येथे कांदळवनावर भरणी करुन कांदळवन नष्ट केल्याबाबतची तक्रार केली आहे. सदर तक्रारी संदर्भात उपाआयुक्त ठाणे महानगरपालिका यांचा अहवाल सदस्य सचिव यांच्या कार्यालयात प्राप्त झालेला आहे. त्या अनुषंगाने कांदळवन क्षेत्र खाजगी मालकीचे आहे त्यामुळे ठाणे महानगरपालिका संबंधिताविरुद्ध कारवाई करु शकत नसल्याचे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे यांनी अधिकाऱ्यांच्या पथकामार्फत चौकशी करुन केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करण्याच्या सुचना आयुक्तांनी दिल्या. | जिल्हाधिकारी ठाणे. |
| | | 6) श्री. हरीश पांडे :-<br>श्री. हरीश पांडे यांनी मुक्काम दहिसर (प) मुंबई यांनी मढ मार्वे रोड, | जिल्हाधिकारी मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मार्वे गाव ता. बोरिवली येथील कांदळवन बृहन्मुंबई महानगरपालिका व INS हमलाच्या अधिकाऱ्यांनी नष्ट केल्याची तक्रार केली आहे. सदर प्रकरणाची चौकशी झाली असल्याचे उपविभागीय अधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांनी सांगितले. चौकशी अहवाल लेखी स्वरुपात समितीसमोर सादर करण्याच्या सुचना मा. आयुक्तांनी दिल्या. | उपनगर. |
| | | 7) श्री. फ्रान्सिस डिसोजा :-<br>श्री. फ्रान्सिस डिसोजा, अध्यक्ष हरीत नैसर्गिक वैभव बचाव अभियान यांनी भुईगाव येथील मौजे विभागातील पाणथळ जागेवर अतिक्रमणाबाबत व कांदळवन वाचाविण्याबाबत तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी पालघर यांचा अहवाल सदस्य सचिव यांच्या कार्यालयात प्राप्त झालेला आहे. तक्रारीमध्ये मौजे भुईगाव ता. वसई सर्वे क्र. 164 मध्ये असलेला मातीभराव व रस्ता जेसिपीच्या सहाय्याने निष्कासित केलेला आहे. तसेच सर्वे नं. 164 मधील असलेल्या अनाधिकृत बांधकामाबाबत वसई पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे व सदर अतिक्रमण निष्कासित करण्याबाबतची कारवाई उपविभागीय अधिकारी वसई यांचे स्तरावरुन सुरु असल्याचे जिल्हाधिकारी पालघर यांनी कळविलेले आहे.<br>मौजे भुईगाव येथील सर्वे नं. 220 मधील अनाधिकृत बांधकामाबाबत तहसिलदार वसई यांनी श्री. ललित सखाराम म्हात्रे राहणार भुईगाव यांना नोटीस दिली आहे तथापि सदर नोटीसचे विरोधात श्री. म्हात्रे यांनी दिवाणी न्यायालय वसई येथे दावा दाखल केलेला आहे व मा. कोर्टाने सदर बांधकाम तोडू नये अशा प्रकारचा स्थगिती आदेश दिला आहे. सदरचा आदेश रद्द होताच सरकारी खाजन जमिनीवरील अतिक्रमणे तातडीने निष्कासित करण्यात येतील असे जिल्हाधिकारी पालघर यांनी कळविले आहे. यावर न्यायालयामध्ये सविस्तर म्हणणे सादर करुन स्थगिती आदेश उठविण्याबाबत कारवाई करण्याच्या सुचना आयुक्तांनी दिल्या. | जिल्हाधिकारी पालघर. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 8) श्री. अनंत दत्तात्रेय पाटील :- <br>श्री. अनंत दत्तात्रेय पाटील यांनी भुईगाव येथील मौजे विभागातील पाणथळ जागेवर अतिक्रमणाबाबत व कांदळवन वाचाविण्याबाबत तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी पालघर यांचा अहवाल सदस्य सचिव यांच्या कार्यालयात प्राप्त झालेला आहे. तक्रारीमध्ये मौजे भुईगाव ता. वसई सर्वे क्र. 164 मध्ये असलेला मातीभराव व रस्ता जेसिपीच्या सहाय्याने निष्कासित केलेला आहे. तसेच सर्वे नं. 164 मधील असलेल्या अनाधिकृत बांधकामाबाबत वसई पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे व सदर अतिक्रमण निष्कासित करण्याबाबतची कारवाई उपविभागीय अधिकारी वसई यांचे स्तरावरुन सुरु असल्याचे जिल्हाधिकारी पालघर यांनी कळविलेले आहे. | जिल्हाधिकारी पालघर. |
| 4 | नवीन प्राप्त् झालेल्या तक्रारींचा आढावा. | 1. श्री. मॅकेन्झी डाबरे, वसई यांनी भुईगाव वसई पश्चिम येथील पाणथळ जागेवर मोठ्या प्रमाणात मातीचा भराव करुन कांदळवन तोडल्याची तक्रार केली आहे. याबाबत सदर तक्रार जिल्हाधिकारी पालघर यांचे कार्यालयास प्राप्त झाली नसल्याचे निवासी उपजिल्हाधिकारी पालघर यांनी सांगितले. सदरची तक्रार तातडीने जिल्हाधिकारी कार्यालयास पाठविण्याबाबत मा. आयुक्त यांनी सदस्य सचिव यांना सुचना दिल्या. तसेच तक्रारीसंदर्भात अधिकाऱ्यांच्या पथकाने लवकरात लवकर वस्तुस्थितीबाबत चौकशी करुन पुर्तता अहवाल समितीस सादर करण्याच्या सुचना मा. आयुक्तांनी दिल्या. | सदस्य सचिव व जिल्हाधिकारी पालघर. |
| | | 2. श्री. धीरज परब, यांनी भाईंदर पुर्व येथील सरस्वती नगर, साईबाबा नगर, INP Park व जैन नगर येथील कांदळवन/पाणथळ/CRZ 1 मधील प्रतिबंधीत क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर भराव करुन बांधकामे केल्याची तक्रार केली आहे. सदची तक्रार मिरा भाईंदर महानगरपालिकेशी संबंधित आहे. तथापि सदर | सदस्य सचिव व आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | तक्रार मिरा भाईंदर महानगरपालिकेस प्राप्त झाली नसल्याचे सांगितले. तरी सदस्य सचिव यांनी सदर तक्रार तात्काळ उपायुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडे पाठवावी व महानगरपालिकेने तक्रारीच्या संदर्भात आवश्यक ती चौकशी करुन अहवाल लवकरात लवकर सादर करावा. | |
| | | 3. New Link Road Residence Forum, Dahisar West यांनी गोराई खाडी मध्ये भराव करणे तसेच पॅन इंडिया पर्यटन लि. यांनी सुमारे 15 एकर क्षेत्रावर कांदळवन नष्ट करणे याबाबत तक्रार केलेली आहे. यासंदर्भात सदर तक्रार अर्जाची चौकशी जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी केलेली असल्याचे जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांनी सांगितले. चौकशी अहवाल लवकरात लवकर समितीस सादर करण्याच्या सुचना मा. आयुक्तांनी दिल्या. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर. |
| | | 4. श्री. स्टॅलिन डी यांनी मौजे आघाशी ता. वसई जि. पालघर येथे सुमारे 10 एकर पाणथळ क्षेत्र नष्ट केल्याची तक्रार केलेली आहे. यासंदर्भात् तक्रारदार यांनी सदर तक्रारीच्या संदर्भात समितीस माहिती दिली. मा. आयुक्तांनी जिल्हाधिकारी पालघर यांना तक्रारीसंदर्भात चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सुचना दिल्या. | जिल्हाधिकारी पालघर. |

सदर सभेस उपस्थित असणाऱ्या सदस्यांचे आभार मानुन बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

अध्यक्ष,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
विभागीय आयुक्त कोकण विभाग